| MHKO050022992014 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक ७१/२०१४ मधील नि.५३ वरील आदेश वंदना व इतर वि. उल्हास व इतर** |
|---|---|

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी सी.पी.सी आदेश ७ नियम ११ प्रमाणे दाखल केला आहे.

२. यातील प्रतिवादी क्र. १ ते ८ तर्फे विनंती अर्ज असा की, यातील वादींनी प्रतिवादींविरुध्द कायम मनाई मागितली आहे. परंतू सदरील दावा मिळकती या कूळ वहिवाटी खालील असल्याने व वादी हे सदर दावा मिळकतीचे मालक असल्याचा कोणताही कागदोपत्री पूरावा सदर कामी वादी यांनी हजर केलेला नाही. तसेच सदरच्या दावा मिळकती या कूळवहिवाटीखालील असल्याची कबूली वादींनी दाव्यामध्ये स्वतःहून दिलेली आहे. त्यामूळे वादींना मनाई मागण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. त्यामूळे सदरचा दावा चालण्यास पात्र नाही. करीता नूकसान भरपाई म्हणून रुपये ५०,०००/- इतका दंड करण्यात यावा व दावा नामंजूर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

३. वादी यांनी निशाणी ५४ कडे म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज प्रकरण उलटतपासाकरीता असताना दाखल केला. त्यामूळे सदरचा अर्ज चालण्यास पात्र नाही. वादी हे कूळ असताना निव्वळ सदरचे काम लांबविण्याच्या हेतूने यातील प्रतिवादी यांनी अर्ज दिला आहे. प्रतिवादी यांनी आपल्या कैफियतमध्ये देखील वादी हे कूळ असल्याबाबत नमूद केले असल्याने या ही बाबीचा विचार करता सदरचा अर्ज चालण्यास पात्र नाही. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादी क्र. १ ते ८ तर्फे विद्वान वकिल श्रीमती.व्ही.एस.पन्हाळकर, वादीतर्फे विद्वान वकिल श्री. व्ही.डी.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

५. प्रस्तुतचा दावा पाहिला असता असे दिसते की, वादी यांनी दाव्यात नमूद केले आहे की, गट क्र. ७७ ची मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. ४ ते १२ यांचे पूर्वहक्कदार धोंडी फकिरा कांबळे यांच्याकडे संरक्षित कूळ नात्याने वहिवाटीस होती. धोंडी यास चंदन, बाबू व वजीर असे तीन मूले होती. गट क्र. ७७ मध्ये प्रत्येकी १/३ हिश्श्याप्रमाणे चंदन, बाबू व वजीर अशा तीघांची ही वहिवाट होती. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे कायदेशीर वारस वादी व प्रतिवादी क्र. ४, ८ ते १२ यांची १/२ हिश्श्याप्रमाणे स्वतंत्ररीत्या कब्जेवहिवाट असून त्याप्रमाणे त्यांच्या नोंदी झाल्या आहेत. तसेच ते त्यांचे हिश्श्यास कूळ म्हणून असलेल्या मिळकतीमध्ये उस, सोयाबिन, भूईमूग अशी पीके करुन कूळ हक्काने मिळकतीचा उपभोग घेत आले आहेत. त्याप्रमाणे दावा मिळकत ही वादी यांच्या हिश्श्यास असून वादी हे दावा मिळकतीचा उपभोग शांततेने कूळ हक्काने पूर्वापार घेत आले असून जमीन मालक प्रतिवादी क्र. ३ तसेच जोशी यांना खंड देत आले आहेत.

६. तसेच सदर दाव्याची विनंती पाहिली असता असे दिसते की, सदर दावा हा ताबा व कायम मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यात अशी विनंती आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी अगर तर्फे इसमांनी वादी यांच्या दावा मिळकतीमध्ये कंपाउंड करुन दावा मिळकतीतील कूळ नात्याच्या वहिवाट हक्कास हरकत, अडथळा करु नये व बेकायदेशीररीत्या दावा मिळकतीचा कब्जा बळकावू नये, अशी त्यांना कायम मनाई ताकिद व्हावी ही विनंती वादीने सदर दाव्याद्वारे केली आहे. तसेच सदर दाव्यात निशाणी ४३ कडे मूद्दे माझे मा. पूर्वपिठासीन अधिकारी यांनी काढले असून सदर मूद्दयामध्ये कूळ बाबतचा वादाचा मूद्दा नाही. यावरुन दिसते की, सदर दावा हा कब्जा व कायम मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे व सदर कब्जा व मनाई हुकूमासंदर्भातील दावे चालविण्याचे अधिकार या न्यायालयास आहेत. सदर दाव्यात मुद्दे निघाले असून सदरचा दावा हा पूराव्याकरीता न्यायप्रविष्ठ आहे. असे असताना पूराव्याच्या स्टेजवर प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्याच्या निशाणी १ मध्ये तसेच प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कैफियतीमध्ये देखील कूळाचा उल्लेख आहे व कूळाबाबत सदर दाव्यात कोणताही वादाचा मूददा असल्याचे निशाणी ४३ प्रमाणे दिसून येत नाही. करीता आज रोजी दाव्याच्या विनंतीप्रमाणे सदरचा दावा हा कब्जा व मनाईहुकूमाकरीता आहे व दाव्याच्या विनंतीनूसार सदरचा दावा चालविण्याचे अधिकार या न्यायालयास असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

त्यामूळे सदर दावा दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची व पूरावा देण्याची संधी देणे न्यायोचित होईल. आजच्या स्टेजला सदरचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. करीता सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन उपरोक्त सर्व कारणांमुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>**आदेश**</u>

१. निशाणी ५३ कडील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाहीत.

Digitally signed by MRUNMAYEE M CHOUDHARY
Date: 2022.10.20 11:09:39 +0530

**ठिकाण - इचलकरंजी.**
**दिनांक - १८/१०/२०२२**

**(एम.एम.चौधरी)**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**इचलकरंजी.**